281
05/10/2020

## सातारा जिल्हा परिषद,सातारा

वाचुन - 1. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961 मधील नियम 95 व 96(1)

2. महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय.वैखप्र-2016/प्र. क्र.16/राकावि-2 दिनांक 16 मार्च 2016

3. मुख्य कार्यकारी अधिकारी,सातारा जिल्हा परिषद,सातारा यांच्याकडील अधिकार प्रदान सुधारीत आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-2(2)/660ब/2019 दि.10.10.2019

4. या कार्यालयाकडील मान्य टिपणी दिनांक ०९ /१० /2020

---

जा.क्र.साप्रवि/आस्था-2(2)/660क/2020

दिनांक ०९ / १० /2020

**सुधारित आदेश**

ज्याअर्थी प्रस्तावनेतील अनुक्रमांक 2 शासन निर्णयानुसार शासनाने जिल्हा परिषद सेवेतील कर्मचा-यांच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती रक्कम रुपये 3.00 लाखापर्यत मंजुरीचे अधिकार विभाग प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांना प्रदान केलेले आहेत.

सदर विषयाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी,सातारा जिल्हा परिषद यांनी सातारा जिल्हा परिषद अंतर्गत वर्ग 3 व वर्ग 4 कर्मचा-यांच्या वैदयकिय प्रतिपुर्ती देयका संदर्भात महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961 मधील नियम 95 व 96 (1) नुसार दिलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील अटी व शर्तींना अधीन राहून यापुर्वीचे परिशिष्ठ 3 विषयाचे अधिकार प्रदान आदेशामध्ये सोबत जोडपत्रात नमुद केलेप्रमाणे बांधकाम विभागाकडील कार्यालयप्रमुख (कार्यकारी अभियंता,उत्तर,दक्षिण,लपा,ग्रापापु) यांना वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके मंजूरीचे अधिकार प्रदान करीत आहे.

**अटी व शर्ती**

१. बांधकाम विभाग,उत्तर,दक्षिण,लपा,ग्रापापु,जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त होणा-या वैदयकिय नस्तीबाबत संवर्गनिहा विशेष नोंदवही ठेवून त्यामध्ये प्राप्त प्रस्तावाची प्राप्त दिनांकानुसार जेष्ठता यादी तयार करुन त्याक्रमानुसार नस्तीवर कार्यवाही होईल यांची दक्षता घ्यावी. तसेच संबंधित आर्थिक वर्षामध्ये

मंजूरी दिलेल्या देयकाची सवंर्गनिहाय व कर्मचारी निहाय यादी संबंधित जिल्हा परिषद खाते प्रमुख यांचेकडे सादर करावी.

२. वैदयकिय नस्तींना तांत्रिक मान्यता देण्याची तसेच नस्तीमध्ये अनुज्ञेय असलेल्या व नसलेल्या बाबीचे प्रमाणपत्र देण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांची मान्यता आवश्यक आहे. यामध्ये सुधारित कार्यपध्दतीत विहित करुन स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापी यापुर्वी तांत्रिक मान्यता देण्यात आलेली देयक सुधारीत अधिकाराचे प्रत्यायोजनानुसार मंजुर करावीत.

३. वैदयकिय प्रतिपुर्ती प्रस्ताव मंजूरीकामी सादर करताना संबंधित लिपीकाने वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके तपासणीसाठी निर्धारित केलेल्या 1 ते 36 बाबीची पडताळणी करुन सदर प्रस्तावाची प्रशासकीय छाननी कनिष्ठ प्रशासन अधिकारी / सहाय्यक प्रशासन अधिकारी यापैकी एक अधिका-यांने करणे बंधनकारक राहिल. वित्तीय छाननी व देयकाची परिगणना कनिष्ठ लेखाधिकारी / सहाय्यक लेखाधिकारी यांनी करणे बंधनकारक राहील. म्हणजे त्रिस्तरीय रचनेव्दारे देयक संबंधित कार्यालय प्रमुखाकडे मंजूरीकरिता सादर होईल. तसेच कोणत्याही परिस्थितीत सादर झालेपासुन मंजूरी आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याची कालावधी 1 महिन्यापेक्षा जास्त असू नये याबाबत दक्षता घ्यावी.

४. वैद्यकिय प्रतिपुर्तीबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी प्राप्त होणा-या शासन निर्णय, परिपत्रक,आदेश तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून प्राप्त आदेश याची स्थायी आदेश संचिका अद्यावत ठेवून त्यातील सूचनांच्या आदेशाची तंतोतंत अमलंबजावणी करणे बंधनकारक राहिल.

५. काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये कर्मचा-यांने शासकीय रुग्णालयात न जाता खाजगी रुग्णालयात उपचार घेतले असतील तर अशा काही प्रकरणी वैद्यकिय प्रतिपुर्ती नस्तीसोबत सादर केलेल्या कागदपत्राची तसेच दर्शविलेल्या खर्चाची सत्यता पडताळणी करण्याची जबाबदारी अधिकारी प्रदान केलेल्या संबंधित कार्यालय (कार्यकारी अभियंता) प्रमुखांची राहिल.

६. सदरच्या आदेशान्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार कार्यालय प्रमुख यांना नेमुन दिलेल्या वित्तिय मर्यादेतीलच देयक मंजुर करावीत. वित्तिय मर्यादेत बसविण्यासाठी देयके तुकडे पाडल्याचे दिसुन आल्यास ती वित्तिय अनियमितता समजण्यात येईल.

७. मंजूर करण्यात आलेल्या नस्तीची संबधित विभागाने बाहय लेखा परिक्षण वेळी सर्व देयकांची पडताळणी करण्यात येईल. सदरच्या पडताळणीमध्ये दिसुन येणा-या अतिप्रदान रक्कमेची संबंधित कर्मचा-यांच्या मासिक वेतनातुन वसुल

करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय (कार्यकारी अभियंता) प्रमुख यांची राहिल.

८. एकच देयक दुबार सादर केले जाणार नाही तसेच दुबार मंजूरी देवून अदा केले जाणार नाही यांची मंजूरी प्राधिका-यांने व अर्थ शाखेने कटाक्षाने दक्षता घ्यावी. यासाठी संवर्गनिहाय देयके पारित केलेची स्वतंत्र नोंदवही अर्थ शाखेत ठेवण्यात यावी.

९. वरील बाबत अ.क्र. 7 व 8 चे पृष्टयर्थ विहित नमुन्यातील बंधपत्र संबंधिताकडून घेण्यात यावीत.

१०. वैद्यकिय प्रतिपुर्ती देयक मंजूरीबाबतच्या आदेशाच्या प्रती सर्व संबंधित वरिष्ठ कार्यालयास पाठविणे बंधनकारक राहिल.

११. वैद्यकिय प्रतिपुर्तीचे देयक सादर करताना संबंधित कर्मचारी कोणत्याही प्रकारे चुकीची अथवा अनुज्ञेय नसलेली देयके सादर करणार नाहीत अथवा अशी देयके मंजूर होणार नाहीत याबाबत दक्षता देयके सादर करणारे कर्मचारी व मंजूरी प्राधिकारी यांनी घ्यावी. एखादे देयक अनुज्ञेय नसताना जाणीपुर्वक सादर केल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित कर्मचा-याविरुध्द तात्काळ प्रशासकीय / फौजदारी कारवाई करावी.सदर करावाई करण्यास दिरंगाई अथवा हलगर्जीपणा केल्याची बाब निर्दशनास आल्यास संबंधित मंजूरी प्राधिकारी यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन यथानियम कारवाई करण्यात येईल.


(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातरा जिल्हा परिषद,सातारा
मो.नं.९४२२९९३३३३
ceozpstr@gmail.com


प्रति,

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग उत्तर/दक्षिण/लपा/ग्रापापु, सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---------------------------------- यांना महितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत- उपअभियंता,बांधकाम,ग्रापापु,लपा उपविभाग------------------------ यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

✓ – DPL – Pl. upload . (श्री. नटराज) 17/11

# जोडपत्र

| अ. क्र. | अधिकाराचा प्रकार | यापूर्वी याबाबतचे अधिकार प्रदान केले आहेत काय असल्यास शक्तीचे प्रत्यायोजनाचा क्रमांक | अ.क्र.3 नुसार यापुर्वी प्रदान केलेल्या अधिकाराचे स्वरुप | कोणत्या नियमान्वये व शासन आदेशान्वये मु.का.अ. यांना अधिकार प्राप्त झाले आहेत | कौणत्या नियमान्वये सदरचे अधिकार प्रदान करता येतील. | अधिकार प्रदान करावयाचा आहे त्या अधिका-यांचा हुद्दा | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | सातारा जिल्हा परिषदे- कडील वर्ग-3 चे तांत्रिक कर्मचा-यांची वैद्यकिय प्रतिपुर्ती बिलाची रक्कम मंजुर करण्याचा अधिकार | होय. जा.क्र.साप्रवि/आस्था-2(2)/660ब /2019 दि.10.10.2019 | जि.प.खातेप्रमुख संवर्गाचे र.रु.2.00 लक्ष पर्यतचे वैद्यकिय प्रतिपुर्ती देयक मंजुर करण्याचे अधिकारी<br>गट विकास अधिकारी र.रु.1.00 लक्ष पर्यतचे वैद्यकिय प्रतिपुर्ती देयक मंजुर करण्याचे अधिकारी | महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समित्या अधिनियम 1961 मधील कलम 95 व 96 व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा परिचर्या नियम 1971 चे नियम 22 | म.जि.प. व पं. स.अधिनियम 1961 मधील नियम 95 व 96 | बांधकाम विभागाकडील सर्व कार्यालय प्रमुख (कार्यकारी अभियंता,उत्तर, दक्षिण, ग्रापापु, लपा) | अधिनस्त असलेल्या तांत्रिक संवर्गातील वर्ग 3 कर्मचा-यांच्या वैद्यकिय खर्चाच्या देयकांना रक्कम रुपये 2.00 (अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) लाखापर्यतच्या प्रस्तावांना मंजूरी देणे. | सोबतच्या आदेशातील अटी व शर्तीस तसेच शासनाकडील प्रचलित शासन आदेशाचे पालन करण्याच्या व जिल्हा आरोग्य अधिकारी, यांची तांत्रिक मान्यतेच्या अधिन राहून. |

Sd/-
(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातरा जिल्हा परिषद,सातारा
मो.नं.९४२२९९३३३३
ceozpstr@gmail.com